Mauli Vidyapeeth's

# Mahila Kala Mahavidyalaya, Beed

Internal Quality Assurance Sell

Academic year :- 2023-24

Department of geography

## *Activity List*

---

World Ozone Day and World Geography Day were celebrated under the Department of Geography during the academic year 2023 - 24 in the college. On this occasion, the principal of the college while guiding the students told the importance of the day we celebrate. Also, various activities were conducted under the department. Students were made aware of the importance of environment on the occasion of Ozone Day. Students enthusiastically participated in the activities organized in the college.

## Activity List

1) World Ozone Day.
2) World Geography Day.
3) Wallpaper publication







*( जागतिक ओझोन दिन निमित्त प्राचार्य डॉ संध्या आहेसकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना)*




*. ( जागतिक ओझोन दिन निमित्त प्रकाशन करताना प्राचार्य, डॉ.संध्या आयस्कर डॉ. जाधव व्हि.डी. डॉ .बोबडे बी.बी. व विद्यार्थिनी)*



*( जागतिक ओझोन दिन साजरा करताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी व कर्मचारी वर्ग)*




. ( *जागतिक भूगोल दिन निमित्त भूगोल विभाग अंतर्गत भित्तीपत्रक प्रकाशन करताना प्राचार्य डॉक्टर आहेस्कर मॅडम डॉक्टर जाधव व्हिडिओ डॉक्टर बोबडे बीबी व विद्यार्थिनी)*




*( जागतिक भूगोल दिन निमित्त विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. जाधव व्ही. डी)*




. ( जागतिक भूगोल दिन निमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर)



CHAMPAVATEE PATRA

# चंपावतीपत्र

बीड (महाराष्ट्र) | वर्ष ५८ वे । अंक २३४

सोमवार, दि.१८ सप्टेंबर २०२३ । पाने ८ किंमत रु.३

## महिला कला महाविद्यालयात ओझोन दिन उत्साहात साजरा

### ओझोनच्या थराचे संरक्षण करणे काळाची गरज प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर

बीड । प्रतिनिधी

येथील माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाद्वारे दि.१६/०९/२०२३ रोजी ओझोन दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रम प्रसंगी विचार मंचावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर या होत्या तसेच भूगोल विभागाचे डॉ. वसुदेव जाधव व डॉ. बबन बोबडे यांची उपस्थिती होती. सुरुवातीला डॉक्टर बबन बोबडेयांनी ओझोन दिन का साजरा करतात याविषयी माहिती सांगितली. ओझोन दिनाची माहिती देणाऱ्या भितीपत्रकाचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थिनी कु. आदिती बोगांणे (बी.ए. द्वितीय वर्ष) या विद्यार्थिनींनी मनोगतातून पृथ्वीचे संतुलन राखणे काळाची गरज आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविकातून डॉ. वसुदेव जाधव यांनी केले सूर्याकडून येणारे अतिनील किरणे ओझोन थरामुळे अडविले जातात. ओझोन वायूचे संरक्षण केले नाही तर पृथ्वीवरील सजीव सृष्टी धोक्यात येऊ शकते त्यामुळे ओझोनच्या थराचे जतन करणे आवश्यक आहे. पृथ्वीवर वृक्ष लागवड करणे तसेच विषारी रासायनिक द्रव्य उत्सर्जित होऊ न देणे हे मानवाचे काम आहे याबाबत माहिती प्रस्ताविक करून दिली. अध्यक्ष समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी पर्यावरणाच्या दृष्टीने ओझोन वायू किती महत्त्वाचा आहे या बाबत उदाहरणासह माहिती दिली.तसेच ओझोन चा थर निश्चित करून्या, हवामानातील बदल कमी करून्या २०२३ या वर्षाचे घोषवाक्य सांगून त्याविषयी माहिती दिली. त्यात ओझोनचा थर कमी होत आहे त्याविषयी जनजागृती करणे, ओझोन थर कमी होऊ नये याकरिता वृक्ष लागवड, वाहनांचा कमी वापर, रासायनिक कीटकनाशकांचा कमी वापर आणि पर्यावरण संरक्षण या बाबी महत्त्वाच्या आहेत. त्या अनुषंगाने मा. प्राचार्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.बबन बोबडेयांनी केले. प्रस्ताविक डॉ.वसुदेव जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पार्श्वभूमी

दिनांक १५ जानेवारी २०२४ सोमवार    गंमत भंडारी    ई-पेपर : www.parshvbhumi.com    Reg.No.L/85/RNP/Beed/20


## महिला कला महाविद्यालयात भूगोल दिन उत्साहात साजरा

बीड दि १४ (प्रतिनिधी) – येथील महिला कला महाविद्यालयांमध्ये भूगोल विभागाच्या वतीने व प्राचार्य डॉ संध्या आयस्कर यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ जाधव डॉ .बोबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भूगोल दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला भूगोल विभागाच्या वतीने विद्यार्थिनींनी तयारी केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य, डॉ. संध्या आयस्कर यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.जाधव व्हि.डि. यांनी केले . प्रसिद्ध भूगोलकार डॉ. सी.डी. देशपांडे यांच्या जन्मदिनाच्या



निमित्ताने वाढदिवस साजरा करण्याऐवजी १४ जानेवारी हा भूगोल दिन साजरा करावा असे डॉ. सी.डी.देशपांडे यांनी नमूद केले होते. असे सांगितले तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी भूगोल हा आपल्या दररोजच्या जीवनातील अत्यंत जवळचा विषय असून आपल्याला तो बाजूला करता येणार नाही असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. बोबडे बी.बी. यांनी केले


# लोकाशा

संपादक – विजयराज बंब    Email- majhalokasha@gmail.com    9225939491

दि. १५ जानेवारी २०२४ • No-L/18/RNP/06/Beed/2013-15 • बीड, छत्रपती संभाजीनगर-जालना, लातूर-धाराशिव-नांदेड-परभणी-हिंगोली


## महिला कला महाविद्यालयात भूगोल दिन उत्साहात साजरा

बीड, दि.१४ (लोकाशा न्युज) – येथील माऊली विद्यापीठ संचलित, महिला कला महाविद्यालयांमध्ये भूगोल विभागाच्या वतीने भूगोल दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य, डॉ. संध्या आयस्कर या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.जाधव व्ही.डी.होते. तसेच डॉ. बोबडे बी.बी.यांची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भूगोल विभागाच्या वतीने विद्यार्थिनींनी तयारी केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा. प्राचार्य, डॉ. संध्या आयस्कर यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे



प्रस्ताविक डॉ.जाधव व्हि.डि. यांनी आपल्या प्रस्ताविकातून प्रसिद्ध भूगोलकार डॉ. सी.डी. देशपांडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने वाढदिवस साजरा करण्याऐवजी १४ जानेवारी हा भूगोल दिन साजरा करावा असे डॉ. सी.डी.देशपांडे यांनीनमूद केले होते. या दिवशी सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो व उत्तर गोलार्धातील तापमानत तिळा–तिळाने वाढ होते असे सविस्तर सोदाहरणासह स्पष्ट केले.